<u>अंतकालीन नफा क्र.०१/२०१९ मधील निशाणी २६ वर आदेश</u>

(दिनांक ०७ जुलै, २०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी गैरअर्जदारचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार – फकिरा तुकाराम जाधव यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०२१ रोजी बाळापूर, ता. बाळापुर जि. अकोला येथे झालेला आहे. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे परंतु नजरचुकीने विलंब माफीचा अर्ज वारस अभिलेखावर घेण्याचा अर्जासोबत दाखल करणे राहून गेलेले होते. अर्जदार हे वयोवृध्द असून प्रस्तुत प्रकरण हेतुपुरस्सरपणे प्रलंबित ठेवण्याचा त्यांचा कोणताही हेतु नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. वारस अभिलेखावर घेण्याच्या अर्जावर गैरअर्जदार यांच्या प्रस्तावित वारसांना नोटिस काढण्यात आली. त्याअन्वये त्यांचे वारस हजर झाले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. त्यांचे असे कथन की, प्रस्तुत अर्जातील नमुद कारण संयुक्तीक नसून विश्वासार्ह नाही .त्यामुळे अर्ज नामंजुर करावा . मंजुर केल्यास रु.२०००/– इतक्या खर्चावर मंजुर करावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाच्या अवलोकनावरुन अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२ अन्वये अंतकालीन नफा मिळणेसाठी प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरणाचे कामकाज प्रलंबित असतांना गैरअर्जदार फकिरा तुकाराम जाधव यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०२१ रोजी झालेला आहे. त्या संदर्भात अर्जदार यांनी मयत फकिरा तुकाराम जाधव यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांना नोटिसची बजावणी झालेली असून ते सदर प्रकरणी विधीज्ञामार्फत हजर झालेले आहे. प्रस्तुत अर्जाला मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांनी हरकत नोंदविली असली तरी त्यांनी ते मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारस नाही, ही बाब नाकारलेली नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता

असेही दिसून येते की, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०७.१०.२०२१ रोजी मयत फकिरा तुकाराम जाधव यांच्या मृत्युच्या ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधीनंतर दाखल केलेला आहे. अर्जदार तर्फे आजरोजी विलंब माफीचा अर्ज दाखल करण्यात आलेला असून नजरचुकीने वारस अभिलेखावर घेण्याच्या अर्जासोबत विलंब माफीचा अर्ज दाखल करणे राहून गेले होते, असे कारण नमुद केलेले आहे. मुदत कायदा कलम ५ अन्वये विलंब माफीसाठी संयुक्तीक कारण असणे आवश्यक आहे. प्रस्तुत मुळ अर्जातील अर्जदाराचे वय वर्ष ८० इतके दिलेले असून अर्जदाराचे वय लक्षात घेता अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक दिसून येते. परंतु गैरअर्जदार यांना झालेल्या मानसिक व शारीरीक त्रासासाठी प्रस्तुतचा अर्ज खर्चावर मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आ दे श :**

१. अर्ज रु.२००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by DIPMALA MAHENDRA PATIL
Date: 2023.07.04 02:09:37 +0530

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक : ०७/०७/२०२३.
ठिकाणः बाळापूर

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Date of Decision | :- | 07/07/2023 |
| Order signed by P.O on | :- | 07/07/2023 |
| Order uploaded on | :- | 07/07/2023 |